# बाधितांना आणखी दोन कोविड केंद्रांचा आधार

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये करोना विषाणूचा संसर्ग दिवसेंदिवस वाढत असून, राज्य शासनाकडून शक्य तितकी वैद्यकीय क्षमता वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. 'एमएमआरडीए'पाठोपाठ आता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (एमएमआरसी) पश्चिम उपनगरातील दहिसर व बोरिवली येथे हे दोन कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात येत आहे.

आजमितीस केवळ मुंबईतच ८५०हून अधिक जणांचा करोना संसर्गामुळे

**'मुंबई मेट्रो रेल'चा पुढाकार**

**दहिसर चेकनाका**
**८०० खाटा**

**कांदरपाडा, बोरिवली**
**२५० खाटा**

मृत्यू झाला आहे. यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत राज्य सरकारच्या एमएमआरडीए, एमएमआरसी, पोर्ट ट्रस्ट आदी संबंधित संस्थांनी लढाईत

संग्रहित छायाचित्र



उडी घेतली आहे. एमएमआरसीतर्फे दहिसर चेकनाका परिसरात ८०० खाटांचे अलगीकरण केंद्र उभारण्यात येणार आहे. लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. या केंद्रात २०० ऑक्सिजनीटेड खाटा उपलब्ध करण्यात येणार आहेत. या केंद्रांसोबत कांदरपाडा, बोरिवली आरटीओ कार्यालयानजीक २५० खाटांचे कक्ष उभारण्याचे नियोजन सुरू आहे. या ठिकाणी हाय डिपेंडन्सी युनिट्स तसेच डायलिसिसची सुविधा असणारा अतिदक्षता विभाग देखील असणार आहे. 'मुंबई शहर सध्या कठीण परिस्थितीतून जात आहे. अशावेळी अधिकाधिक वैद्यकीय क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने आम्ही या केंद्रांची निर्मिती करीत आहोत. गरज भासल्यास मुंबईतील इतर भागांत अशी केंद्र उभारण्यास एमएमआरसी प्रशासन सज्ज आहे,' असे एका अधिकाऱ्याने सांगितले.